# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## ग्रामगीता व्याख्यानमाला २३ व २४ ऑगस्टला

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने व प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावती यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून ‘प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता’ व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प आदर्श विज्ञान, जयरामदास भागचंद कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय, धामणगांव रेल्वे येथे गुरुवार, दि. २३ ऑगस्ट, २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर भूषविणार असून ‘संत आणि चमत्कार’ या विषयावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. प्रदीप विटाळकर सन्माननीय वक्ते म्हणून अभ्यासपूर्ण व्याख्यान देणार आहेत. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, धामणगांव एज्युकेशन सोसायटी, धामणगांवचे उपाध्यक्ष श्री प्रदीपकुमार लुणावत, प्रचारभीष्म शामरावदाद मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समितीचे अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड यांची प्रामुख्याने उपस्थिती याप्रसंगी लाभणार आहे.

द्वितीयपुष्प मातोश्री सुभद्राबाई पाटील कला व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, जि. वाशिम येथे दि. २४ ऑगस्ट, २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न होणार असून ‘संत आणि चमत्कार’ या विषयावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. प्रदीप विटाळकर अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर भूषविणार असून, याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, ज्ञानोपासक शिक्षण प्रसारक संस्था, मानोराचे अध्यक्ष श्री अरविंद पाटील इंगोले व प्रचारभीष्म शामरावदाद मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समितीचे अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

धामणगांव रेल्वे व मानोरा येथील व्याख्यानमालेकरिता सर्व नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. अजय देशमुख, आदर्श विज्ञान, जयरामदास भागचंद कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि. अमरावतीचे प्राचार्य डॉ.वाय.बी. गांडोळे व मातोश्री सुभद्राबाई पाटील कला व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, जि. वाशिमचे प्राचार्य डॉ.एन.एस. ठाकरे यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २०/०८/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी